# स्वामी रामानंद तीर्थ
# मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## दूरशिक्षण संचालनालय

पदव्युत्तर पदवी (एम.ए.) द्वितीय वर्ष

*** लोकप्रशासन ***



**खंड क्र. (०६) कल्याणकारी प्रशासन**

## मानवविज्ञान विद्याशाखा अभ्यासमंडळ

**डॉ. उध्दव भोसले**, कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

- **प्राचार्य डॉ. जे.एम. बिसेन**
  अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा
- **डॉ. केशव देशमुख**
  अध्यक्ष, मराठी अभ्यासमंडळ
- **डॉ. आर. एम. जाधव**
  अध्यक्ष, हिन्दी अभ्यासमंडळ
- **डॉ. एम.एम. निवरगी**
  अध्यक्ष, इंग्रजी अभ्यासमंडळ
- **डॉ. हमीद अशरफ**
  अध्यक्ष उर्दू अभ्यासमंडळ
- **डॉ. गणंजय कहाळेकर**
  अध्यक्ष, संस्कृत अभ्यासमंडळ
- **डॉ. आत्माराम शिंदे**
  अध्यक्ष, इतिहास अभ्यासमंडळ
- **डॉ. नारायण कांबळे**
  अध्यक्ष, समाजशास्त्र अभ्यासमंडळ
- **डॉ. विलास आघाव**
  अध्यक्ष, राज्यशास्त्र अभ्यासमंडळ
- **डॉ. अरूण तवार**
  अध्यक्ष, अर्थशास्त्र अभ्यासमंडळ
- **डॉ. उत्तम इंगळे**
  अध्यक्ष, लोकप्रशासन अभ्यासमंडळ
- **डॉ. सुनिल सांळुके**
  अध्यक्ष, तत्वज्ञान अभ्यासमंडळ



| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम समन्वयक** | **संचालक, दूरशिक्षण संचालनालय, स्वा.रा.ती.म.वि., नांदेड** |
| **शिक्षणक्रम समन्वयक** | **डॉ. गोविंद यमलवाड** |
| **भाषा संपादन** | **डॉ. सुरेश गजभारे** |
| **आशय संपादन** | **डॉ. विजय तरोडे** |
| **अनुदेशन संपादन** | **प्राचार्य डॉ. राम जाधव व डॉ. दिपक कोंडावार** |
| **पुस्तक निर्मिती** | **संचालक, दूरशिक्षण संचालनालय, स्वा.रा.ती.म.वि., नांदेड** |
| **प्रकाशक** | **कुलसचिव, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड** |
| **©कॉपी राईट** | **कुलसचिव, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड** |



सदरील मुद्रित साहित्याचे सर्व अधिकार मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडे आरक्षित. या मुद्रित साहित्याचा कुठलाही घटक, आशय, भाग यांची पुनर्निर्मिती करता येणार नाही किंवा संगणकात साठवता येणार नाही. त्याचे कुठल्याही साधनात, साहित्यात मा. कुलसचिव यांच्या परवानगीशिवाय संक्रमण करता येणार नाही.

**अस्वीकृत :** या पुस्तकातील मुद्रित साहित्य केवळ शैक्षणिक उदिष्ट डोळयांसमोर ठेवून तयार केले आहे ते मार्गदर्शक तत्त्वे किंवा शिफारस नव्हे. सदरील पुस्तकातील खंड रूपातील आशय हा सध्या चालू अभ्यासक्रमातील प्रकाशित आशयावरील माहितीचे संकलन आहे; ज्यात अभ्यासमंडळाचे अध्यक्ष व अधिष्ठाता यांचे योगदान आहे. या खंडातील माहिती गरजेनुसार, नियमानुसार, मागणीनुसार व उपलब्ध कायद्याच्या आधारे बदलल्या जाऊ शकते.



**मुखपृष्ट सजावट** : डॉ. दिपक कोंडावार, **समन्वयक, दूरशिक्षण संचालनालय,** स्वा.रा.ती.म.वि.नांदेड.

**मुद्रक** :

# Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded

## Directorate of Distance Education

## Advisory Committee - 2017-2019

| Sr. No. | Name of Experts | Designation |
|---|---|---|
| 01 | **Dr. Udhav Bhosle**<br>Vice – Chancellor, SRTM University, Nanded | **Chairperson** |
| 02 | **Prof. Ramzan M. Mulani**<br>Registrar, SRTM University, Nanded | **Member** |
| 03 | **Dr. Ravi N. Sarode,** Director, Board of Examination and Evaluation, SRTM University, Nanded | **Member** |
| 04 | **Dr. Govind B. Katlakutte**<br>Accounts and Finance officer, SRTM University, Nanded | **Member** |
| 05 | **Dr. Deepak B. Panaskar,** Professor, School of Earth Sciences,SRTM University, Nanded | **Member** |
| 06 | **Dr. Sharad S. Kulkarni**<br>Principal, Nutan College, Selu | **Member** |
| 07 | **Dr. Bhagwan S. Jadhav,** Director,<br>School of International Students, SRTMU, Nanded | **Member** |
| 08 | **Dr. Balasaheb U Jadhav**<br>Principal, Shivaji College, Parbhani | **Member** |
| 09 | **Dr. Datta M. Khandare,** Prof. School of Commerce and Management Sciences, SRTM University, Nanded | **Member** |
| 10 | **Dr. Sarjerao Shinde,** Principal, Bhai Kishanrao Deshmukh College, Chakur, Dist.Latur | **Member** |
| 11 | **Dr. Ajay Patil**<br>Principal, Sushiladevi Deshmukh College, Latur | **Member** |
| 12 | **Dr. Dnyeshwar Ghodke**<br>Lokmanya Mahavidyalaya, Sonkhed | **Member** |
| 13 | **Dr. D. K. Kendre**<br>Gramin Mahavidyalaya, Vasantnagar Kotgyal Dist. Nanded | **Member** |
| 14 | **Mr. Deepak Sawalkar**<br>I/c Principal, Model College, Hingoli | **Member** |
| 15 | **Prin. Dr. Ram Jadhav**<br>Director, Directorate of Distance Education, SRTM, University, Nanded | **Member Secretary** |

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | घटकाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | कल्याणकारी प्रशासन : अर्थ,स्वरूप, व्याप्ती व महत्व | डॉ. सुरेश गजभारे | ०१ |
| २ | कल्याणकारी प्रशासनाचे संघटन | डॉ. सुरेश गजभारे | १० |
| ३ | कल्याणकारी प्रशासनाचे प्रमुख क्षेत्र | डॉ. विजय तरोडे | २३ |
| ४ | कल्याणकारी योजना | डॉ. संजय देबडे | ४१ |
| ५ | कल्याणकारी प्रशासनातील घटक | डॉ. संजय देबडे | ५३ |
| ६ | कल्याणकारी प्रशासनासमोरील समस्या | डॉ. विजय तरोडे | ६५ |

## घटक क्र. ६.४ कल्याणकारी योजना

अनुक्रमणिका:

**६.०. प्रास्ताविक:**

**६.१. उद्देश**

**६.२. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान**

६.२.१. ध्येय:

६.२.२. उद्देश:

६.२.३. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभिमानातील घटक:

६.२.४. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभिमानाची वैशिष्ठये:

**६.३ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना**

६.३.१. उद्दिष्टये :

६.३.२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेची वैशिष्टये:

६.३.३ योजनेअंतर्गत भान्यता प्राप्त कामे:

६.३.४ अंमलबजावणीची यंत्रणा:

**६.४ स्वच्छ भारत अभियान**

६.४.१ उद्दिष्टये

६.४.२ स्वच्छ भारत अभियानाचे ध्येय/लक्ष्ये:

६.४.३ स्वच्छ भारत अभियानाचे घटक:

**६.५ सारांश**

**६.६ पारिभषिक शब्द:**

**६.७ आदर्श उत्तरे (आपली प्रगती तपासा)**

**६.८ स्वाध्याय**

**६.९ संदर्भ:**

**६.१०. अधिक वाचनासाठी पुस्तके:**

### ६.०. प्रास्ताविक:

भारताने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाही शासन पध्दतीचा स्वीकार करून लोककल्याणकारी राज्याचे स्वरूप धारण केले आहे. लोककल्याणकारी राज्यामध्ये समाजातील मागास घटक वंचित, शोषित, उपेक्षित, दुर्बल घटकांचां सर्वागिण विकास करून त्यांना विकासांचा मुख्य प्रवाहात आणणे हे प्रत्येक शासनाचे प्राथमिक व अत्यंत महत्वपूर्ण कार्य मानले जाते. म्हणून भारतामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीपासूनच शासनाद्वारे समाजातील या मागास, दुर्बल, वंचित, शोषित घटकांचा सर्वागिण विकास, कल्याण व सुरक्षितता या दुष्टीने विविध धोरण, कायदे, योजना व कार्यक्रमांची निर्मिती करून त्याची प्रशासकीय यंत्रनेद्वारे अंमलबजावणी केली जात आहे. सत्तेवर आलेल्या अनेक सरकारांनी सामजिक कल्याणाच्या अनेक योजना व कार्यक्रमाची निर्मिती करून समाजकल्याण साधण्याचा प्रयत्न केला आहे. यातील काही महत्वाच्या योजना पैकी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना व स्वच्छ भारत अभियान या तीन योजनांची माहिती आपण प्रस्तुत प्रकरणात घेणार आहोत.

## ६.१. उद्देश

या घटकांचा अभ्यास केल्यानंतर आपणास...........

१. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचे ध्येय व उद्दिष्ठे समजतील.

२. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियाना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकांची माहिती मिळले.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची उद्दिष्ठे व वैशिष्टे स्पष्ट होतील.

४. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणी ची यंत्रणा माहित होईल.

५. स्वच्छ भारत अभियानाचा उद्देश व त्यातील विविध घटकांची माहिती मिळेल.

## ६.२. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील लोकांच्या आरोग्याच्या स्थितीवर अवलंबून असते. देशाचा सामाजिक आर्थिक पर्यायाने सर्वांगीण विकस साध्य होण्यास हातभार लागतो. त्यामुळे जगातील सर्वच देशांनी आरोग्य विषयक, कार्याला प्राधान्य दिलेले दिसते. भारताने देखील स्वातंत्र्य प्राप्तीपासूनच अगदी प्रथम पंचवार्षिक योजनेपासून अनेक आरोग्य विषयक योजना व कार्यक्रम आखून सुदृढ भारताच्या पायाभरणी सुरूवात केली आहे. केंद्रीय स्तरावर एक स्वतंत्र केंद्रीय आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालय स्थापन करून त्यामार्फत आरोग्य विषमक सेवा सुविधा उपलब्ध करून देवून आरोग्याच्या अनेक योजना व कार्यक्रम राबविण्यात आले आहेत. परंतु असे असले तरी भारतातील आरोग्यची स्थिती फारसी समाधानकारक नाही. विशेषत: ७०% लोकसंख्या असलेला ग्रामीण भागातील आरोग्य /स्थिती चिंताजनक आहे. त्यामुळे भारत सरकारने ग्रामीण भागातील लोकांच्या आरोग्य/स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी १२ एप्रिल २००५ रोजी पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभिया नही योजना राबविण्यास सुरूवात केली आहे. ग्रामीण भागातील वंचित गटांना व ग्रामीण लोकसंख्येला परवडणाऱ्या व गुणवत्तापूर्ण आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे. हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. सुरूवतीला ज्या राज्यामध्ये सार्वजनिक आरोग्य सुविधांचा अधिक अभाव आढळतो अशा १८ राज्यात अरूणाचल प्रदेश, झारखंड, आसाम, बिहार, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि कश्मीर, मणिपूर, मिझोरम, मेघालय, मध्यप्रदेश, नागालॅंड, ओरिसो, राज्यस्थान, सिक्कीम, त्रिपूरा, उत्तराखंड आणि उत्तर प्रदेश या राज्यात हे अभियान राबविलात येत होते. परंतू नंतर या अभियानाचे यश पाहून संपूर्ण भारतात हे अभियान राबविले जात आहे. २०१३ साली राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानास समाविष्ठ करण्यात आले आहे.

### ६.२.१. ध्येय:

१. सार्वजनिक आरोग्यावरील खर्च GDP च्या २ ते ३% करणे.

२. आरोग्य सेवेचे व्यवस्थापण आणि सेवांची उपलब्धता बळकट करणे.

३. अशा कार्यकर्त्या, ग्राम आरोग्य योजना भारतीय सार्वजनिक आरोग्य सेवा नुसार परिणामकारी व गुणकारी सेवा देणे, ग्रामीण रूग्णालयाचे बळकटीकरणं करणे इ.

४. स्थानिक आरोग्य विषयक उपचार पध्दती (AYUSH) पूर्नजिवीत करणे.

५. जिल्हा आरोग्य व्यवस्थापणासाठी कार्यक्रमाचे विकेंद्रींकरण करणे.

### ६.२.२. उद्देश:

१. अर्भक व माता मृत्यु दर कमी करणे.

२. ग्रामीण भागात आरोग्य सेवांची उपलब्धता वाढविणे.

३. स्थानिक पातळीवरील सभोवच्या आजारासह सांसर्गिक व असांसर्गिक आजाराचे पूर्वानुमान, प्रतिबंध व नियंत्रण करणे
४. लोकसंख्या स्थिर करणे व स्त्री–पुरूष प्रमाणात समतोल राखणे.
५. आरोग्यदायी जीवन शैलीबद्दल जनजागृती करणे.
६. स्थानिक आरोग्य विषयक उपचार पध्दती पूर्नजिवीत करणे व आयुष ला मुख्य प्रवाहात आणणे.

**६.२.३. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभिमानातील घटक:** ग्रामीण भागातील लोकांना आरोग्य सेवा परिणामकारक पुरविण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत आरोग्य विषयक अनेक कार्यक्रम व योजना राबविला जात आहेत. हे कार्यक्रम किंवा घटक पूढील प्रमाणे आहेत.

**१. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम:** प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाचा दुसरा टप्पा हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांचा एक प्रमुख घटक असून त्याचा उद्देश माता मूत्यु दर व अर्भक मूत्युदर व एकूण जनन दर कमी करून बाल आरोग्य सुधारणे व लोकसंख्या स्थिर करणे हा आहे.

**२. कुटूंब कल्याण कार्यक्रम:** लोकसंख्या स्थीर करणे व त्या द्वारे जनतेचे आरोग्य मान सुधारणे हे कुटूंब कल्याण कार्यक्रमाचे उद्दिष्ठे आहे. कुटूंब कल्याण कार्यक्रमात या पुर्वी ज्या मुख्य भर नसबंदी शस्त्र क्रियेवर होता. तरी दोन अपत्याच्या जन्मात योग्य अंतर ठेवणे ही बाब सुध्दा तितकीच महत्वाची असल्यामुळे तांबी, इंड्रायुसेरिन साधने, पांरपारिक संतति प्रतिबंधक साधने इ. पध्दतीच्या प्रसारावर जास्त भर देत आहे. हा कार्यक्रम अनेक सामाजिक संस्थाचा सहाय्याने राज्यात राबविला जात आहे.

**३. जननी सुरक्षा योजना:** ग्रामीण व नागरी भागात संस्थाचालक प्रसुतिला प्रोत्साहन देवून त्याव्दारे दारिद्रय रेषेखालील तसे एस.सी. व एस.टी. कुटूंबातील लाभार्थ्या मधील माता मुत्यु प्रमाण व अर्भक मूत्यु दर कमी करणे या उद्देशाने भारतात २००५ते २००६ पासून जननी सुरक्षा योजना राबविली जात आहे. या योजनेचा उद्देश सर्व प्रसुति खात्रीने प्रशिक्षित मार्फत होवून त्याव्दारे माता मूत्युदर व अर्भक मूत्युदर व अर्भक मूत्युदर कमी करणे हा आहे.

**४. शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम:** या अभियानांतर्गत शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम हा शिक्षा अभियानाच्या सहकार्याने राबविला जातो. या कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भागातील इयत्ता १ ते १० व शहरी भागातील १ते४ थी या वर्गातील विद्यार्थीची दरवर्षी आरोग्य तपासणी केली जाते व त्यांना हृदय शस्त्रक्रिया सारख्या मोठया शस्त्र क्रिया, डोळे ,दंत इ. शस्त्रक्रियेसाठी मोफत वैद्यकिया सेवा पुरविला जातात.

**५.सार्वजनिक लसीकरण कार्यक्रम:** देशामध्ये सार्वजनिक लसीकरण कार्यक्रम १९८५–८६ पासून राबविण्यात येत असून त्याचा उद्देश घटसर्प,क्षयरोग,डांग्या खोकला, धर्नुवात,पोलिओ व गोवर या सारख्या लसीकरणाव्दारे प्रतिबंध करता येण्या जोग्या आजारामुळे गर्भवती स्त्रिया, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या मूत्युचे रोग ग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी करणे यासाठी उत्तम दर्जाच्या लसीकरण सेवा पूरविणे हा आहे.

**६. राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम:**हिवताप, हत्तीरोग, मेंदुज्वर, डेंगुताप, चिकनगुन्या इ. रोगांच्या प्रतिबंध रोगनिदान उपचार व नियंत्रणासाठी देशात हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

**७.सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम:** या अभियानांतर्गत क्षयरोगाची लागण झालेल्या रूग्णांची DOTS द्वारे तपासणी करून ते पूर्ण बरे होई पर्यत प्रभावीपणे उपचार करणे संपूर्ण कालावधीसाठी औषधांचा खात्रीशीर पुरवठा करणे तसेच औषधोपचाराला रूग्णाचा प्रतिसाद नियंत्रीतपणे नोंदवण्याची यंत्रणा देशात राबविण्यात येत आहे.

**८. राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम:** या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ठे दृष्टीदोष शोधून काढून उपचाराद्वारे अंधत्वाचे प्रमाण कमी करणे, तसेच प्रत्येक जिल्हयात डोळयाची काळजी घेण्यासाठी व्यापक सुविधा निर्माण करून देण्यासाठी मनुष्यबळ विकसित करणे हे आहे.

**९.राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम:** या कार्यक्रमाचे उद्दिष्ठे समाजातील कुष्ठ रोग्यांचे प्रमाण कमी करणे, कुष्ठ रोगाने पिडीत सर्व व्यक्तींनी उच्च दर्जाच्या कुष्ठ रोगा विषयक सेवा पुरविणे आणि कुष्ठरोग्यांचे शारिरीक सामाजिक व आर्थिक पूर्ववसन करणे हे आहे.

**१०. राष्ट्रीय आयोडीन न्युनता विकार नियंत्रण कार्यक्रम:**या कार्यक्रमांतर्गत गलंडग्रस्त रूग्णाचे सर्वेक्षण करणे, आयोडीन युक्त मीठाची निर्मिती आणि प्रादुर्भाव झालेल्या जिल्हयात आयोडीनच्या प्रमाणावर लक्ष ठेवणे ही कार्ये केली जातात.

**६.२.४. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभिमानाची वैशिष्ठे:** ग्रामीण भागातील लोकांना परवडणाऱ्या व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा व सुविधा उपलब्ध करून देणे हा या अभियानांचे स्वरूप पुढील वैशिष्टयावरून स्पष्ट करता येईल.

**१. आशा (अधिकृत सामजिक आरोग्य कार्यकर्ती):** राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभिमानांतर्गत 'आशा' स्वयंसेविका योजना राबविण्यात येत आहे. आरोग्य हा अत्यंत महत्वपूर्ण घटक असून आरोग्य यंत्रणा,सेवाभावी संस्था व ग्रामस्थ, समाजातील अन्य घटक यांमध्ये आरोग्या संदर्भात जागृकता, सुसंवाद, समन्वय, प्रोत्साहन वाटाघाटी निर्माण करण्याच्या दृष्टिने 'आशा' स्वयंसेविका महत्वपूर्ण सामाजिक दुवा म्हणून कार्यरत आहे. आशाची निवड पंचायतीद्वारे केली जात असून ही प्रसिध्दीत स्वयंसेविका आपल्या कार्याबाबत ग्रामपंचायतीला जबाबदार आहे. ती सार्वत्रिक लसीकरण सल्ला संरक्षक सेवा प्रजनन व बाल आरोग्य स्वच्छता व इतर आरोग्य विषयक सेवा पूरविण्यासाठी कार्य करते.

**२.उपकेंद्राचे बळकटीकरण:** ग्रामीण आरोग्य सेवेतील प्राथमिक आरोग्य स्तरावरील उपकेंद्राचा पायाभूत विकास करण्यासाठी आवश्यक निधी देवून त्यांचे बळकटीकरण केले जात आहे. तसेच आवश्यक औषधी व साहित्याचा पूरवठा उपकेंद्राला केला जात आहे.

**३.प्राथमिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरण:**ग्रामीण आरोग्य सेवेतील प्राथमिक आरोग्य केंद्र हे अत्यंत महत्वपूर्ण घटक असून त्यांचा विकास करणे, प्राथमिक आरोग्य केद्रांले बळकटीकरण करणे हा या अभियांनाचा हेतू आहे. या अंतर्गत आवश्यक डॉक्टर, औषधी व साधनसामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून दिले जाते आहे.

**४. सामुदायिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरण:**प्रथम रेफरल युनिट (संदर्भ सेवा) म्हणून सामुदायिक आरोग्य केंद्राला २४ तास सेवा देण्यासाठा कार्यशील बनविणे, तसेच आवश्यक तज्ञ डॉक्टर, नर्स, कर्मचारी यांच्या नेमणूक करणे, गुणवत्तापूर्ण सेवा देणे इ. द्वारे सामुदायिक आरोग्यकेंद्राची बळकटीकरण केले जात आहे.

**५. आयुष (AYUSH):** आयुष ही एक स्थनिक पारंपरिक उपचार पध्दती असून या मध्ये आयुर्वेद, योग, युनानी, सिध्द व होमीओपॅथी या उपचार पध्दतीचा समावेश होतो. ग्रामीण आरोग्यचे सेवेमध्ये या स्थानिक पारंपरिक उपचार पध्दतीचा प्रचार–प्रसार करून या पध्दतीला मुख्य प्रवाहात आणने हा या अभियानाचा एक हेतू आहे. या अंतर्गत सामान्य आजारासाठी उपकेंद्र प्राथमिक आरोग्य केंद्र, सामुदायिक आरोगय केंद्र इ. स्तरावर आयुष औषधी व उपचार उपलब्ध करून दिले जात आहे.

**६. रूग्ण कल्याण समिती:** विविध आरोग्य केंद्रावर लोकांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी रूग्ण कल्याण समित्या स्थापन करण्यात आल्या असून या समित्या स्थापन

करण्यात आल्या असुन याय समित्याद्वारे आरोग्य सेवेना दर्जा निश्चित करून त्यावर लक्ष दिले जाते.

अशा प्रकारे ग्रामीण भागातील लोकांना दर्जेदार व परवडतील अशा आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे हेतुने सुरू करण्यात आलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचे स्वरूप आपणास स्पष्ट करता येईल. या अभियांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमामुळे ग्रामीण आरोग्य सेवेच्या दर्शत निश्चीतच सुधारणा होण्यास मदत होत आहे.

**आपली प्रगती तपासा स्वयंमूल्यमापन प्रश्न**

**अ. एका वाक्यात उत्तरे लिहा:**

१. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची सुरूवात केव्हा झाली?
२. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा मुख्य उद्देश काय?
३. जननी सुरक्षा योजना कोणता वर्षी सुरू झाली?
४. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाचा मुख्य उद्देश काय?

## ६.३ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना

ग्रामीण भागाचा विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक विकास होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील लोकांना पुरेशा प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दिल्यास ग्रामीण भागाचा व पर्यायाने देशाचा सामाजिक व आर्थिक विकास साधता येतो. रोजगार मिळणे हे व्यक्तीच्या उदरनिर्वाहासाठी तसेच समाज व राष्ट्राच्या विकासासाठी आवश्यक असते. परंतु प्रत्येक व्यक्तिला रोजगार मिळतोच असे नाही. हे जाणून ओळखून भारतसरकारने प्रत्येकाच्या हाताला रोजगार देण्यासाठी २ फेब्रु २००६ रोजी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा लागु करून या दिवशी आंध्र प्रदेशातील अनंतपूर जिल्हयात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची सुरूवात केली. ही योजना प्रथम सुरूवातीला २०० जिल्हयात सुरू करण्यात आली. दुसऱ्या टप्पात वर्ष २००७—०८ पासून ही योजना संपूर्ण भारतात लागु करण्यात आली. भारतसरकारने महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी २ ऑक्टोबर २००९ पासून या योजनेचे नामकरण महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना असे केले आहे.

केंद्रसरकारच्या व राज्यसरकारच्या रोजगार निर्मितीच सर्व योजना एकत्रित करून त्यातील चांगल्या तरतुदीच्या लाभ ग्रामीण भागातील मजुरांना देणारी एक व्यापक व अभिनव अशी योजना असून जगातील सर्वात मोठी रोजगार निर्मितीची व उपजिवीकेची संधी निर्माण करणारी योजना म्हणून ओळखली जाते.

### ६.३.१. उद्दिष्टये :

१. ग्रामीण अकुशल कामगारांना १०० दिवसांच्या रोजगाराची हमी देऊन त्यांच्या उपजिवीकेची साधणे वाढून राहणीमानात सुधारणा घडवून आणणे.
२. ग्रामीण भागात लोक उपयोगी टिकाऊ मालमत्ता निर्माण करणे. उदा.रस्ते,कॅनल,तलाव,विहीरी इ.
३. अनुसूचित जाती व जमातीचे सक्षमीकरण करणे.
४. शहरी भागात लोकांचे होणारे स्थलांतर थांबविणे.
५. ग्रामीण स्त्रियांचे सक्षमीकरण करणे.
६. बेरोजगारीची समस्या सोडविणे.
७. ग्रामपंचायतीचे बळकटीकरण करून ग्रामीण भागात लोकशाही रूजवणे.

**६.३.२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेची वैशिष्टये:** महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागातील बेकारी व दारिद्रयाचे निर्मूलन करून लोकांच्या आर्थिक विकास घडवून आणणारी अभिनव योजना असून या योजनेची काही ठळक वैशिष्टये पूढील प्रमाणे आहेत.

**१. नावं नोदंणी (मागेल त्याला काम):** ग्रामीण कुटूंबातील प्रौढ व्यक्ती जो अकुशल काम करण्यास इच्छूक आहे. अशी व्यक्ती ग्रामपंचायतीमध्ये तोंडी किंवा लेखी अर्जद्वारे नोंद करून कामाची मागणी करू शकतो. माच्या नोंदणीसाठी कायदया अंतर्गत प्रत्येक कुटूंब हे संयुक्त रित्या १०० दिवसाचा रोजगार प्राप्त करण्यास पात्र आहे.

**२. रोजगार पत्र** (Job Card) : नाव नोंदणी केल्यानंतर व्यक्तिच्या रहिवासाची व वयाची पडताळणी केल्यानतंर नोदंणी केलेल्या कुटूंबास १५ दिवसाच्या आत रोजगार पत्र दिले जाते. प्रत्येक रोजगार पत्राचा एक विशिष्ट ओळख क्रमांक असतो. या नूसार कुटूंबाच्या रोजगार व भत्ताची नोंद केली जाते.

**३. कामासाठी अर्ज:**काम मिळण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात अर्ज करावा लागतो अर्ज केल्यानंतर १५ दिवसाच्या आत अर्जदारास काम मिळणे बंधनकारक असते

**४. बेरोजगारी भत्ता:** कामासाठी नोंटणी केल्यानंतर १५ दिवसापर्यंत जर रोजगार मिळाला नाही तर त्या लाभ धारकास बेरोजगारी भत्ता दिला जातो.

**५. कामाचे स्वरूप:** गरजूंना काम उपलब्ध करून देताना गावाच्या ५ कि.मी. आत काम दिले जाते. जर ५ कि.मी. आत काम मिळाले नाही तर १०% जास्त मजुरी दिली जात. कामा मध्ये स्त्रियांना प्राध्यान्य दिले जाते. एकूण लाभधारकात ३३% महिला असावी.

**६. मजुरी:** स्त्री आणि पुरूष दोघांनाही समान मजुरी दिली जाते. तसेच दर आठवडयाला मजुरीची रक्कम संबंधीताला दिली जाते. मोबदल्याची रक्कम ही लाभधारकांच्या वैयक्तीक संयुक्त खाते अथवा पोस्ट ऑफिस खात्यातचे जमा करणे बंधनकारक आहे.

**७. नियोजन** :कामाची अंमलबजावणी अर्ज स्वीकारणे, जॉब कार्ड तयार करून देणे, १५ दिवस रोजगार देणे, हिशोब ठेवणे इ. कार्ये ग्रामपंचायत करते. कामाची निवड, कामाचे स्वरूप, कामांचे ठिकाण ठरविणे, कामावर देखरेख ठेवणे ही कामे ग्रामसभा पार पाडते व ग्रामपंचायत त्याला मान्यता देते.

**६.३.३ योजनेअंतर्गत मान्यता प्राप्त कामे:**

१.जलसंवर्धन

२.वनीकरण

३. जलसिंचन कालवे

४.मध्यम सिंचन

५.पांरपारिक जल साठयाचे नुतनीकरण

६.पूर व्यवस्थापण

७. ग्रामीण रस्ते जोडणी

८. शासनाने निर्देशीत केलेली कार्य

९. दुष्काळ निवारण

**६.३.४ अंमलबजावणीची यंत्रणा:** महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी अनेक संस्थांचा सहभाग व सहकार्याची आवश्यकता असते. प्रामुख्याने

या योजनेच्या अंमलबजावणीत पाच प्रमुख घटक महत्वाची भुमिका बजावत आहेत हे घटक पुढील प्रमाणे—

**१. केंद्र स्तर:** या योजनेच्या अंमलबजावणीत केंद्रीय स्तरावरील केंद्र सरकारची भुमिका महत्वाची असून केंद्रसरकारचे ग्रामीण विकास मंत्रालय हे या योजनेचे नियोजन निधीची उपलब्धता, कायदेशीर व संस्थात्मकं सहाय्य, कार्यात्मक मार्गदर्शन, नियंत्रण, हिशेब तपासणी इ. कार्ये पार पाडते.

**२. राज्य स्तर:** राज्य स्तरावर या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक राज्य सरकार राज्य रोजगार हमी परिषद स्थापन करते. या मध्ये वार्षिक अहवाल तयार करण्याचे काम असते. राज्य सरकारला जिल्हा पातळीवर होणाऱ्या कामाचे सर्वेक्षण करणे, त्याचे नियोजन करणे, विविध कार्याची यादी तयार करणे, कायदे व नियम तयार करणे तसेच राज्य रोजगार हमी निधी उभारणे, तांत्रिक सहाय्य प्रशिक्षण बेरोजगारी भत्ता वाटप इ. कार्ये करावी लागतात.

**३. जिल्हा स्तर :** जिल्हयातील सर्व कामांचे नियोजन करून घेणे, निधीचा हिशेब ठेवणे केंद्रव राज्य शासनाकडे आवश्यक ती महिती पाठविणे आणि कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे कार्य जिल्हा स्तरा वरील यंत्रणा पार पाडते. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर जिल्हा प्रकल्प समन्वयक हे पद निर्माण करण्यात आले आहे हा अधिकारी जिल्हाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी दर्जाची असतो. या योजनेच्या अंमलबजावणीची जिल्हा स्तरावरील सर्व जबाबदारी या अधिकाऱ्याची असते.

**४. तालुका स्तर :** या योजनेच्या अंमलबजावणीत तालुका स्तरावरील घटकांची दीेल भुमिका महत्वची आहे. तालुका पातळीवर कामाचे नियोजन करणे, त्याचे परिक्षण करणे, ग्रामपंचायतीने पुर्ण न केलेले ५०% काम तालुका स्तरावर केले जाते. तालुका स्तरावर एक पुर्णवेळ योजना अधिकारी किंवा प्रकल्प अधिकारी नेमला जातो. हा प्रकल्प अधिकारी गाव पातळीवरील कामाची छाननी करणे, कामाची मागणी व उपलब्धता यांचे नियोजन करणे, सामजिक अंकेक्षन, इ. कामे तो जिल्हा स्तरावरील अधिकाऱ्याचा नियंत्रणाखाली कार्य करतो.

**५. ग्रामस्तर:** या योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामस्तरावरील ग्राम सभा व ग्रामपंचायत यांची सर्वात जास्त महत्वाची भुमिका आहे. या योजने अंतर्गत ग्रामपंचायती मध्ये नोंदणी होऊन रोजगार मिळत असल्यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीत ग्रामपंचायतीला अंत्यत महत्वाचे स्थान आहे. कामाचे नियोजन करणे, लाभार्थ्यांची नोंदणी करणे, जॉब कार्ड देणे, कामाचे वाटप करणे, मजुरी देणे व कामाचा निधी वाटप करणे इ. कार्ये ग्रामपंचायतीला पार पाडावी लागतात.

त्सेच या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत ग्रामसभा र्प्यायाने गावातील ग्रामस्थांची भुमिका सुध्दा महत्वाची आहे. या योजने अंतर्गत गावात कोणती कामे हाती घ्यायची हे ठरविणे, योजनेची माहिति देणे, नोंदणी करणे, अर्जाची तपासणी करणे, लाभार्थ्यांची व कामाची निवड करणे इ. कार्ये ग्रामसभा पार पाडते.

अशा प्रकारे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सुरू केलेला म. गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे स्वरूप स्पष्ट होते.

**आपली प्रगती तपासा स्वयं मूल्यमापन प्रश्न ब. रिकाम्या जागा भरा:**

१. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी सर्वप्रथम ....... जिल्हयात झाली.

२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मध्ये लोकांना ........ दिवसाच्या रोजगाराची हमी देण्यात आली आहे.

३. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत रोजगार प्राप्त करण्यासाठी अर्जदाराला ............ येथे अर्ज करावा लागतो.
४. रोजगारासाठी नोंदणी केलेल्यास जर १५ दिवसात रोजगार देता आला नाही तर त्यास .......... दिला जातो.
५. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेला ................ तारखेपासून म.गांधी यांचे नाव देण्यात आले.

## ६.४ स्वच्छ भारत अभियान

मानवी जीवनात स्वच्छतेला फार महत्व आहे. कारण स्वच्छतेचा व आरोग्याला प्रतिष्ठित जीवन जगण्यासाठी तसेच वैयक्तीतक आणि सामाजिक आरोग्याचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी ही स्वच्छता आवश्यक आहे. त्यामुळे स्वच्छतेच्या स्थितीमध्ये सुधारणा करण्यासाठी सरकारकडून स्वातंत्र्य प्राप्तीपासूनच अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये १९५४ साली ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात आला. १९८६ साली केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम सुरू करण्यात आला. १९९९ साली केंद्रिय ग्रामीण स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले, तसेच १ एप्रिल २०१२ पासून निर्मल भारत अभियान सुरू करण्यात आले. त्यानंतर २०१४ साली मोदी सरकार केंद्रात सत्तेवर आल्यावर स्वच्छतेच्या कार्याच्या या प्रयत्नांना गती प्रदान करण्यासाठी आणि स्वच्छतेचे जागतिक मापदंड प्राप्त करण्यासाठी भारत सरकारने म.गांधी यांच्या १४५ व्या जयंती निमीत्त २ ऑक्टोंबर २०१४ रोजी संपूर्ण देशामध्ये 'स्वच्छ भारत अभियान' सुरू केले.

सन २०१९ हे वर्ष म.गांधी यांचे १५० वे जयंती वर्ष असून तो पर्यंत संपूर्ण देशात स्वच्छता कार्यक्रमाची अंमलबजावणी करून स्वच्छ भारत निर्माण करून म.गांधी यांना श्रध्दांजली देण्याचा मनोदय सरकारचा या योजने मागे आहे. स्वच्छ भारत अभियानाचे स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) व स्वच्छ भारत अभियान (नागरी) असे दोन भाग असून केंद्र सरकारच्या पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्रालयाद्वारे हा कार्यक्रम संपूर्ण देशभर राबविला जात आहे.

### ६.४.१ उद्दिष्टये

१. शौचालये, घनरूप आणि द्रवरूप कचरा निर्मुलन यंत्रणा निर्माण करणे.
२. गावाची स्वच्छता करणे आणि सांडपाण्याची व्यवस्था उपलब्धता करून देणे.
३. सुरक्षित आणि पुरेसे पेयजल उपलब्ध करून देणे.
४. वैयक्तिक, सामुहिक आणि सामुदायिक शौचालयय बांधणे.
५. उघडयावर शौचास जाण्यास प्रतिबंध घालणे.
६. शौचालये बांधणे व त्याच्या वापराचा आढावा घेणारी यंत्रणा स्थापण करणे.
७. ग्रामपंचायतीच्या सहाय्याने घनरूप आणि द्रवरूप कचरा व्यवस्थापन करणे
८. सन २०१९ पर्यंत देशातील सर्व गावात पाण्याची पाईपलाईन टाकणे.

**६.४.२ स्वच्छ भारत अभियानाचे ध्येय/लक्ष्ये:** भारत सरकारच्या सध्या सुरू असलेल्या 'निर्मल भारत अभियान' या कार्यक्रमांतर्गत वर्ष २०२२ पर्यंत १००% सफाई यंत्रणा (Sanitation) निर्माण करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. परंतू 'स्वच्छ भारत अभियान' कार्यक्रमांतर्गत वर्ष २०१९ पर्यंत हे लक्ष्य पूर्ण करण्याचे निश्चीत करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत वैयक्तिक व सामुदायिक स्वरूपाची शौचालये बांधण्यात येणार आहे. सदरील लक्ष्य साध्य करण्यासाठी केंद्रसरकार सर्व केंद्रीय मंत्रालये, केंद्र व राज्य योजना आयोग, कार्पोरेट सामजिक जबाबदारी(CSR) याची मदत घेणार आहे.

**६.४.३ स्वच्छ भारत अभियानाचे घटक:** स्वच्छ भारत अभियानाचे प्रमुख घटक पुढील प्रमाणे—

**१.प्रदान यंत्रणा:** स्वच्छता गृहासंबंधी प्रदान यंत्रणेचे ग्रामीण भागात बळकटीकरण करण्यासाठी खालील बाबी करण्या येणार आहे.

- स्वच्छ भारत अभियानांतर्गत वर्ष २०१९ पर्यंत राज्यांनी पाणी व स्वच्छता गृहांची उपलब्धता करून घ्यावी यासाठी राज्याबरोबर सामंस्य करार केला जाणार आहे. तसेच २०१५ पर्यंत पाणी व स्वच्छतागृहांची अंमलबजावणी होण्यासाठी राज्यपातळीवर एकत्रित संरचना निर्माण करण्यात येत असून पाणी व स्वच्छ गृहासाठी दिलेल्या निधीची अदालबदल करता येते.
- राज्यांना पाणी व स्वच्छतागृहांची सुविधा लवकारात लवकर उपलब्ध करून देता यावी यासाठी त्यांना लवकर निधी वाटप केले जाणार आहे. हा निधी प्रकल्पावर आधरित 'जिल्हा नियोजन आराखडा' या गोष्टीचा विचार करून देण्यात येणार आहे त्यासाठी तयार करावा लागणार आहे.
- ज्या कुटूबांना स्वच्छता गृह बांधण्यासाठी कोणत्याही प्रकारची सरकारी मदत मिळणार नाही परंतु ज्यानी स्वच्छतागृह बांधण्यासाठी निधीची गरज आहे अशांना सरकार नाबार्ड सिडबी तसेच इतर बॅकांकडून हमी शिवाय कर्ज मिळवून देणार आहे.
- तालूका स्तरावर 'स्वच्छता समन्वयक यंत्रणा' विकसित करणे जी ग्रामपंचायतीला स्वच्छता कार्यात मदत करेल.
- देशातील प्रत्येक ग्रामपंचायतील 'एक स्वच्छता दुता' ची नेमणूक करून त्याला स्वच्छता विषयक कौशल्येचे मार्गदर्शन केले जाणार.
- देशात स्वच्छता गृहांचा वापर होती की नाही याचा वार्षिक आढावा घेणारी यंत्रणा स्थापन करणे.
- निर्मूल भारत पुरस्कार बंद करून स्वच्छ भारत पूरस्कार देणार.

**२. केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांतर्गत सुरू योजनांशी 'स्वच्छ भारत अभियानाची एक केंद्रीभुमकता:**

- वैयक्तिक स्वरूपाची स्वच्छतागृहे बांधण्यासाठी मनरेगा, इंदिरा आवास योजना या योजनांचे सहाय्य घेतले जाते. तसेच समुदाय स्वच्छता परिसर यासाठी मागास क्षेत्र अनुदान निधीचा वापर केला जाता आहे तसेच शाळा आणि अंगणवाडी येथील स्वच्छतागृह बांधणीसाठी मानव संसाधन मंत्रालय व महिला व बालकल्याण मंत्रालयाची मदत घेतली जाणार आहे. तसेच खासदांराचा स्थानिक विकास निधीचा ही वापर केला जाणार आहे.
- तसेच वैयक्तिक कुटूंबाकडील शौचालये, शाळा व अंगणवाडी येथील शौचालये, समुदाय स्वच्छता परिसर इ. ठिकाणी असणाऱ्या शौचालयाना सातत्याने पाणीपुरवठा करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पिण्याचे पाणी कार्यक्रमाचे सहाय्य घेतले जाणार आहे.
- केंद्र सरकार कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी (CSR) अंतर्गत केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या तसेच खाजगी कंपन्याकडून निधी घेवून तो स्वच्छता अभियांन कार्यक्रमासाठी वापरणार आहे.

**३. माहिती, शिक्षण आणि संप्रेषण :** स्वच्छ भारत अभियानाचे उद्दिष्टचे साध्य करण्यासाठी लोकांच्या वर्तनुकीत व मानासिकतेत बदल होणे अपेक्षित आहे. लोकांना स्वच्छता गृहाचे महत्व आणि त्यापासूनचे होणारी फायदे याची माहिती देण्यासाठी केंद्रीय पाणी व स्वच्छता मंत्रालय लोकांना दारोदारी जावून सांगणार आहे. या अभियानाची लोकांना माहिती देवून लोकांमध्ये जनजागृती घडवून आणणे इ. बाबीची पुर्तता करण्यासाठी प्रसार माध्यमांचा वापर मोठया प्रमाण केला जात आहे उदा. आकाशवाणी, टि.व्ही. चित्रपट, जाहिराती, पोस्टर, सार्वजानिक ठिकाणी संदेश लिहणे इ.

तसेच कुटूंबस्तरावर स्वच्छता विषयक जाणीव जागृती करण्यासाठी आशा कार्यकर्ती स्वयंसहाय्यता गट, स्वयंसेवी संस्था, अशासकीय संघटना यांची मदत घेतली जाते. त्याबरोबरच शाळेतील मुले, शिक्षक, डॉक्टर, नेते यांचाही या चळवळीच्या प्रसारासाठी माध्यम म्हणून वापर केला जातो.

**४. वित्तीय अंदाज आणि काल मर्यादा:** संपूर्ण देशात स्वच्छ भारत अभियान राबविण्यासाठी सन २०१९ पर्यंत जवळपास २ लाख कोटी रूपये खर्च अपेक्षित असून वैयक्तिक कुटूंब शौचालये, शाळा, अंगणवाडी येथील शौचालये बांधणी कार्यक्रम वर्ष २०१९ पर्यंत १०० पुर्ण करणे अपेक्षित आहे.

अशा प्रकारे आपणास स्वच्छ भारत अभियानाचे स्वरूप स्पष्ट करता येते.

**आपली प्रगती तपासा स्वयंमूल्यामापन प्रश्न क. जोडया लावा.**

| योजनेचे नाव | सुरू होण्याचे वर्ष |
|---|---|
| १. निर्मल भारत अभियान | अ. १९८६ |
| २. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम | ब.२०१४ |
| ३. स्वच्छ भारत अभियान | क. १९९९ |
| ४. संपूर्ण स्वच्छता अभियान | ड.२०१२ |

## ६.५ सारांश

अशा प्रकारे समाजकल्याण साध्य करण्यासाठी तसेच समाजाचा सामजिक व आर्थिक विकास साधण्यासाठी सरकारद्वारे उपरोक्त प्रमुख योजनांची निर्मीती करून त्याची ग्रामीण भागात अंमलबजावणी केली आहे. राष्ट्रीय ग्रामीण अभियानांर्तगत राबविला जात असलेल्या कार्यक्रम व योजनामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुविधा मध्ये आमुलाग्र बदल होत असून ग्रामीण लोकांना आरोग्य सेवा दर्जेदार व परिणामकारक मिळत आहेत. या अभियानांर्तगत सर्वच गावात आरोग्य आणि स्वच्छता समित्या स्थापना करण्यात आल्या आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राची पायाभूत विकास करून त्यांचे बळकटीकरण केले जात आहे. तसेच गावामध्ये १० लाख अशा स्वयंसेविका कार्यकर्त्यांची नियुक्त करण्यात आली आहे. या अभियानामुळे ग्रामीण भागात आरोग्य बाबत मोठय प्रमाण लोकांची मानसिकाता बदलत आहे. परिणामीक या सर्व प्रयत्नामुळे ग्रामीण आरोग्य स्थितीमध्ये निश्चीतच सुधारणा होत असून त्या दिशेने अणून बरेच काही करणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील लोकांना गावातच रोजगार उपलब्ध करून देवून ग्रामीण भागातील बेकारी आणि दारिद्रय कमी करण्यासाठी भारत सरकारद्वारे म.गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची संपूर्ण भारतात अमंलबजावाणी केली जात आहे. या योजनेमुळे ग्रामीण बेकारी कमी होऊन ग्रामीण लोकांना रोजगार मिळाला आहे. त्यामुळे लोकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावकात मदत होत आहे. तसेच ग्रामीण भागातील लोकांची रोजगार निर्मीत

शहराकडे होणारे स्थलांतर काही प्रमाणात कमी झाले आहे. विशेषत: आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटकांना या योजनेद्वारे खुप मोठा दिलासा मिळाला आहे. अशा प्रकारे या योजनेमुळे अनेक सकारात्मक परिणाम घडून आले आहेत असे असलेतरी या योजनेत होत असलेल्या भ्रष्टाचारामुळे ही योजना जनसमाजात बदनाम झाली असून रोजगार आम्ही अर्धे तुम्ही अर्धे मी अशी ग्रामीण म्हणयाचे तयार झाली आहे.

स्वच्छता हा विषय सर्वाचाचे जीवनांशी संबंधीत असा विषय आहे. त्यावर प्राधान्याने प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने २०१४ साली सत्तेवर आलेल्या मोदी सरकाराने स्वच्छ भारत अभियान हा स्वच्छतेवर आधरित एक चांगला कार्यक्रम सुरू केला असून त्यात प्रत्येक भारतीयानी सहभागी होणे आवश्यक आहे. लोकांच्या राहनीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी स्वच्छतेच्या मूलभुत सुविधेकडे लक्ष देणे बाबत लोक शिक्षणांची गरज आहे. भारतीय नागारिकांना घरात व वैयक्तिक जीवनात स्वच्छता मालमत्ता आपल्या मालकीची आहे ही संकल्पना अजूनही भारतीय लोकात रूजलेली नाही. हा दृष्टीकोन बदलेल्या पाहिजे. स्वच्छतेकडे लक्ष दिल्यास आर्थिक विकासांत ही बाब लोकांपर्यत गेली पाहिजे. आरोग्य, स्वच्छता आणि आर्थिक विकास यांच्यातील आंतरसंबंधीचे महत्व लोकांना कळले तरच स्वच्छ भारत अभियानामुळे भारत स्वच्छ होईल.

## ६.६ पारिभषिक शब्द:

- **आयुष** (AYUSH) : ही एक स्थानिक पांरपारिक उपचार पध्दती असून यामध्ये आयुर्वेद, योग, युनानी, सिध्द निसर्गोचार आणि होमीयोपॅथी या उपचार पध्दतीचा समावेश होतो.
- **आशा** (ASHA): आशा म्हणजे 'सामाजि मान्यता प्राप्त आरोग्य कार्यकर्ती' ही एक गाव पातळीवर आरोग्य क्षेत्रात कार्य करणारी प्रशिक्षीत स्वयंसेविका होय.

## ६.७ आदर्श उत्तरे (आपली प्रगती तपासा)

**अ. एका वाक्यात उत्तरे लिहा:**

१. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान हे १२ एप्रिल २००५ रोजी सुरू झाले.

२. ग्रामीण भागातील वंचित गटांना व ग्रामीण लोकसंख्येला गुणवत्तापुर्ण व परडवणाऱ्या आरोग्य सेवा—सुविधा उपलब्ध करून देणे हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानास मुख्य उद्देश आहे.

३. वर्ष २००५—०६ पासून जननी सुरक्षा योजना सुरू झाली.

४. प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रमाचा मुख्य उद्देश बालमूत्यु व माता मूत्युदर कमी करणे हा आहे.

**ब. रिकाम्या जागा भरा:**

१. अनंतपूर

२. १००दिवस

३. ग्रामपंचायत

४. बेरोजगारी भत्ता

५. ०२ ऑक्टोबर २००९

**क. जोडया लावा:**

| योजनेचे नाव | सुरू होण्याचे वर्ष |
|---|---|
| | अ. १९८६ |
| १. निर्मल भारत अभियान | ब.२०१४ |
| २. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम | |

३. स्वच्छ भारत अभियान क. १९९९
४. संपूर्ण स्वच्छता अभियान ड.२०१२

## ६.८ स्वाध्याय

**दिर्घोत्तरी प्रश्न:**

१. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील विविध घटकांची माहिती सांगा.
२. म.गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेची वैशिष्टये विशद करा.
३. स्वच्छ भारत अभियानाचे स्वरूप स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न:**

१. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची उद्दिष्ठये सांगा.
२. म.गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेचे उद्देश सांगा.

**टिपा द्या:**

१. आशा कार्यकर्ती
२. जननी सुरक्षा योजना

## ६.९ संदर्भ:

१. प्रा.कोत्तापल्ले लक्ष्मण (२०१४), भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगबाद.
२. डॉ. शिरसाठ शाम आणि प्रा.बैनाडे भगवान सिंह (२०१४), पंचायतराज आणि नागरी प्रशासन, विद्या बुक्स पब्लीशर्स, औरंगबाद.
३. घोडके अमोल (२०१२), मानव संसाधन विकास, युनिक ॲकॅडमी, पुणे.
४. हाके गणेश (२०१६), मानव संसाधन विकास, सिनर्जी स्टडी पाईन्ट, पुणे.
५. डॉ. सचदेव डी.आर अक फडके, राऊठे(२०१२), भारतातील समाजकल्याण व समाजकल्याण प्रशासन, केसागर पब्लीकेशन, पुणे.
६. योजना (जानेवारी २०१५), भारतसरकार, नवी दिल्ली.
७. बुलेटिन ऑफ युनिक ॲकॅडमी (डिसेंबर २०१४), द युनिक ॲकॅडमी, पुणे.

## ६.१०. अधिक वाचनासाठी पुस्तके:

१. के.पार्क (२००९), सामजिक आरोग्य परिचर्या, बनारसीदास भनोत, जबलपूर.




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
दूरशिक्षण संचालनालय, ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड ४३१ ६०६ (महा.)
दूरध्वनी:०२४६२–२२९१४४, ई–मेल: decsrtmun@gmail.com
संकेत स्थळ : www.srtmun.ac.in

9 789389 150278